# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर


क्र : मविनिआ/माअअ/68/2018/264

दि. 15.10.2018

प्रति,
श्री. जगनसिंह राजपूत,
ओमसाई निवास, बॅरॅक नंबर 8,
रूम नं. 4, उल्हासनगर-1,
जि. ठाणे.

विषय :- आपला दि. ०३.१०.२०१८ रोजीचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. 03.10.2018 रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, 2005 चे कलम 6 (1) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. 04.10.2018 रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No. | Information Sought | Information Sought |
|---|---|---|
| 1 | विज वितरण कंपनी महाराष्ट्र मध्ये कोणत्याही अधिकाऱ्याने आपल्या पदाचा दुरूपयोग करुन खोटी तथा अन्यायकारक रिकव्हरी लावली तर ग्राहक हा कोर्टामध्ये वेळही जास्त लागतो म्हणून तो न्यायासाठी कोठे दाद मागू शकतो त्याची स्वाक्षरी प्रत मिळावी. | आपणांस आवश्यक असलेली माहितीकरिता आपण विद्युत वीज कायदा, 2003 (Electricity Act, 2003) या पुस्तकाचा संदर्भ घेणे. |
| 2 | विज ही अतिआवश्यक सेवा असून अधिकारी दृष्टबुध्दीने स्वत: ग्राहकाला हे कार्य करून देवून नंतर तेच त्याची सुचना अधिकाऱ्याला देण्यात येत असून सुडबुध्दीने कमाई करत आहेत खबरीला जास्त कमीशन मिळावे म्हणून एसीचा वापर लोड 24 घंटे धरुन 24 महिन्याचे बिल बनवण्यात येत आहे आपण स्वत: विचार करावा एसी कोणत्याही ग्राहकाच्या घरी 24 घंटे व 24 महिने चालतो का ग्राहक न्यायदृष्टीने व माणुसकी या नात्याने ग्राहकास न्याय मिळणे गरजेचे आहे नाही तर ग्राहक व जनतेचे चांगले दिवस येणे फार कठीण आहे. आपल्या देशाच्या संविधान मध्येही लिहले आहे 100 गुन्हेगार सुटले तर चालतील पण गुन्हा न करणाऱ्यावर अन्याय होऊ नये हि बाब सत्य आहे. विज चोरीला पकडा पण त्या विजचोर नसताना त्याच्यावर अन्याय करू नका म्हणून सदर ग्राहक कोर्ट सोडून कोठे न्याय मागू शकतो त्याची प्रत जलद गतीने मिळावी. | |

आयोगाच्या कार्यालयातील प्रथम अपीलीय अधिकारी श्री. अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई हे आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 चे कलम १९ (१) अन्वये सदर पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसाच्या आत अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी


१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in